स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती

(Ph.D.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

● संशोधनाचा विषय ●

"महिला सबलीकरणामध्ये राष्ट्रीय महिला आयोगाचे योगदान : संदर्भ महाराष्ट्र राज्य."

● संशोधक ●

शितल लहू बोडके

● मार्गदर्शक ●

डॉ. नानासाहेब बालासाहेब पाटील

समाजशास्त्र विभागप्रमुख

माधवराव पाटील महाविद्यालय, पालम

ता. पालम जि. परभणी

मे २०१९

महीला सबलीकरणामध्ये राष्ट्रीय महीला आयोगाचे योगदान : संदर्भ महाराष्ट्र राज्य

प्रस्तावना :-

महीला सबलीकरण ही संकल्पना सर्वप्रथम पावलो फीरे यांनी मांडली आहे. स्त्रीला सबल करणारी म्हणजेच दुर्बलता नष्ट करणारी शरीर, मन, बुध्दीला तिच्या स्वतःची जाणीव करून तिचा स्वंय विकासासाठी प्रवृत्त करणारी एक संकल्पना आहे. या दृष्टीने स्त्री सबलीकरण ही स्त्रीयांना सर्व क्षेत्रात सहभागी करून घेणारी प्रक्रीया आहे. स्त्री सबलीकरण ही स्त्रीयांना पुरूषाबरोबर स्थान प्राप्त करून देणारी प्रक्रीया आहे. महीलांच्या विकासाशी संबंधीत असणारी प्रक्रीया आहे. अबला महीलांना सबला करून महीलांना पुरूषाच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रामध्ये समान संधी उपलब्ध करून देणे हे महीला सबलीकरणाचे उद्दिष्ट आहे. महीला सबलीकरणाची प्रक्रीया एक चळवळीच्या रूपाने आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसित झाली आहे. पुरूषांनी वर्षानुवर्षे स्त्रियावर केलेल्या अन्यायाचा सूड उगविणे कींवा स्त्रीप्रधान समाजव्यवस्था निर्माण करणे हा महीला सबलीकरणाचा उद्देश नाही. महीला सबलीकरणाची मागणी स्त्री पुरूष समानतेची आहे. स्त्रियांना पुरूषाबरोबर समान संधी, स्थान, दर्जा, प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी महीला सबलीकरणाची चळवळ प्रयत्नशील आहे. समाजामध्ये स्त्रीला उपेक्षित ठेवण्याच्या तिच्या शोषणासाठी जबाबदार असणाऱ्या शक्तीचे मतपरिवर्तन घडवून आणणे, त्यांच्या विचारांना नवी दिशा देणे हे महीला सबलीकरणाच्या प्रक्रीयेत अपेक्षित आहे.

१) हयुमन राईट्स :-

“स्त्रियांना शक्ती, क्षमता आणि कौशल्य वृध्दिंगत करण्यासाठी तसेच स्वतःचा जीवनमानाचा दर्जा उंचावून स्वयनिर्धारित होण्यासाठी आवश्यक ते सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणीक पर्यावरण निर्माण करण्याची प्रक्रीया म्हणजे महीला सबलीकरण होय.”[१२]

२) प्रा. एस. बी. गजभारे :-

“स्त्रिला सामाजिक, आर्थिक, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करून निर्णय प्रक्रीयेत सामील करणे म्हणजे स्त्री सबलीकरण होय.”[१३]

३) जागतिक बँकेने केलेली व्याख्या :-

“व्यक्तींना कींवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट त्या कृतीमध्ये आणि फलप्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची क्षमता म्हणजे सबलीकरण होय.” [१४]

एकंदरीत स्त्री सबलीकरणाचा पुरस्कार करणारी ही संकल्पना आहे. स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीने विकासाच्या आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणारी ही प्रक्रीया आहे.

भारत हा पितृसत्ताक कुटूंबपध्दती अस्तित्वात असणारा देश आहे. त्यामुळे स्त्रियांना समाजात आजही दुय्यम वागणूक दिली जाते पण ही परिस्थितीत प्राचीन काळी अशी नव्हती. वैदिक काळात स्त्रियांना शैक्षणिक, धार्मिक, जोडिदार निवडीचे स्वातंत्र्य होते, वैदिक काळात स्त्रियांना त्यांच्या अंगातील पात्रता ओळखुन शिक्षण दिले जात असत. तसेच वैदिक काळात स्त्रिया अंगीकार्य सुध्दा करत असत त्याचप्रमाणे स्त्रिया ही पुरूषाप्रमाणे सर्व संस्काराच्या आधिकरी मानल्या जात असत. पुरूषांच्या गैरहजेरीत त्या स्वतः धर्मकार्य करत असे वैदिक काळात स्त्रियांचा दर्जा फार समाधानकारक होता. त्या काळातही बहुपत्नीकत्वाची पध्दतीही रूढ होती. पण स्त्रीला आपले जीवन जगण्याचा हक्क होता. वैदिक काळात विधवा स्त्रियांना पुर्नविवाह करून आपले वैवाहीक जीवन जगण्याचा हक्क होता. म्हणजे वैदिक काळ स्त्री जीवनास सुखकर होता. पण कालातरांने उत्तर वैदिक काळाच्या सुरूवातीला महाभारताची रचना करण्यात आली. महाभारताचा काळ हा संक्रमण अवस्थेतील काळ होता त्यात स्त्रियांच्या स्थितीसंबंधी सुधारणावादी मते आढळतात. असुशासन पर्वात पितामहा भीष्माने स्त्रियांना सदैव पवित्र आणि पुज्य समजुन त्यांच्याशी स्नेहाचा व्यवहार केला जावा असे म्हटल्याचे आढळते. जिथे स्त्रियांचा आदर केला जातो. तिथे देवतांचा वास असतो. या प्रकारची मते आढळुन येते. या काळात स्त्रियांना वेदांचा अभ्यास करण्याची ही परवानगी होती. तसेच त्यांना शिक्षणही दिले जात असत यामुळे या काळातही स्त्रियांची स्थिती उत्तम होती.

मनुस्मृतीने सर्वप्रथम स्त्री जीवनावर बंधने लादली व तेव्हापासुन स्त्रीजीवनाला गृहण लागले. या मनुस्मृती ग्रंथात अस नमूद करण्यात आल होत की स्त्री ही कधीच स्वतंत्र नसते. त्यांना वेद अध्ययन करण्याचा व यज्ञात सहभागी होण्याचा आधिकार नाकारण्यात आला. त्याच बरोबर त्यांना धार्मिक आणि सामाजिक कार्यात सहभागी होण्यासाठी प्रतिबंध घालण्यात आला. विधवा विवाहावरती प्रति बंध लादण्यात आला. यावरून या काळात स्त्री जिवणावर अनेक निर्बध लादण्यात आले व त्यांना गुलामगिरीत ढकलण्यात आल्याचे दिसते. स्मृतीकाळात स्त्रियांची स्थिती शुद्रासमान झाली. स्त्रीकडे मनुष्य म्हणून पाहीले जात नव्हते. तर एखादया भौतिक वस्तुप्रमाणे तिच्याकडे पाहीले जाई. तिला कोणतेही अधिकार नव्हते. स्त्रीचे जीवन चार भिंतीमध्ये बंदिस्त झाले. घराच्या बाहेर सार्वजनिक सभा, उत्सव, इ. सहभागी होण्यास तिच्यावर बंधने लादली गेली.

इ. स. १२०० ते १८०० पर्यतच्या कालखंडाला मध्ययुगीन कालखंड म्हणून ओळखले जाते. मध्ययुगीन काळात स्त्रियाची स्थिती अत्यंत बिकट परिस्थितीची होती. या काळात स्त्रीयांना चूल-मूल एवढयातच गुंतवून ठेवले जात असे. या काळात स्त्रियांना सर्व स्वातंत्र्य हिरावून घेतली होती या काळात बालविवाहाचे खूप प्रमाण वाढलेले होते. गोषा पद्धतीही निर्माण झाली. विधवांच्या पुनर्विवाहाचा आधिकार काढून घेण्यात आला. स्त्रीयांना सती जाण्यास भाग पाडले जायचे या काळात स्त्री ध्या पुर्णपणे परावलंबी बनल्या. बहुपत्नीत्वाची प्रथेमूळे स्त्रियांची स्थिती अतिशय शोचणीय झाली. मध्ययुगीन काळात सर्वसाधारणपणे मुस्लीम व हींदु समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान होते. स्त्रिया कीतीही गुणी असली तरी तिला पुरूषापेक्षा कनिष्ठच समजले जाई. भारतात पडदा पद्धतीचे प्रचलन इस्लाम समाजाद्वारेच केले गेले. यामागचा उद्देश म्हणजे आपल्या स्त्रीचा चेहरा दुसरा कोणत्या पुरूषांनी पाहू नये. अशी संकुचित विचार त्या काळात होते. या काळात स्त्रिला आपला जोडीदार निवडण्याचेही स्वातंत्र्य नव्हते. तो आधिकारही फक्त पुरूषानांच होता मध्ययुगीन काळ स्त्रियासाठी खूप क्लेशदायक होता.

महीला कल्याणाच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने ब्रिटीश काळ हा पाया समजला जातो. या कालखंडामध्ये महीलावर अनेक कौटुंबीक जबाबदाऱ्या लादल्या गेल्या होत्या तरी भारतीय महीलांना पुरूषांची दासी म्हणून वागणूक दिली जात असे मात्र १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात वैचारिक परीवर्तनाला प्रारंभ झाला. स्त्री यांची स्थिती भारतातील समाजसुधारकांना वाटली व या परिस्थितीत परीवर्तन घडवून आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामध्ये प्रामुख्याने राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, स्वामी दयानंद सरस्वती, ईश्वरचंद विदयासागर, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, पंडीता रमाबाई यांनी स्त्रीयांचा समाजातील दर्जा उंचाविण्याकरीता प्रयत्न केले.

भारतात १७ व्या व १८ व्या शतकात स्त्रियांची स्थिती खूप शोचणीय होती. या काळात समाजात बालविवाह जरठकुमारी विवाह, विधवांचे केशवपण, सतीप्रथा, यासारख्या अनिष्ठ प्रथा होत्या. १९ व्या शतकात स्त्रियांचे अन्याय शोषण करणाऱ्या या प्रथा परंपराच्या विरोधात एक पुढलेच पाऊल उचलेले गेले. सुरूवातीला राजा राममोहन रॉय यांनी सतीबंवी करण्यासाठी १८२९ चा कायदा संमत केला. १८५६ विधवा पुणर्विवाह कायदा १८५६ साली संमतीवयाचा कायदा पास झाला. या कायदयामुळे स्त्रियांच्या विवाहाच्या वयात वाढ झाली. स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्यांना शिक्षीत केले पाहीजे. त्यासाठी त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहीजे ओळखुन महात्मा फुले यांनी पूण्यात १८४८ ला मुलीची पहीली शाळा काढली. तसेच विधवाचे केशवपण बंदी, विधवा पुनर्विवाहाला चालना अशी स्त्रीजीवन सुधारक कार्ये फुलेंनी केली.

१९ व्या शतकातील स्त्री-सुधारणांना चालना देण्यास समाजसुधारकांना फार मोठा वाटा होता. म्हणून असे म्हटले जाते की, स्त्रीचळवळीच्या दृष्ट्रीने १९२० ते १९४७ हा काळ खंड निर्णायक ठरलेला दिसतो या काळात भारतीय स्वातंत्र्य आंदोलन जोरात सुरू झालेले होते. गांधीजीनी स्त्रिया या राष्ट्राच्या नागरीक असल्यामुळे त्यांनीही पुरूषांच्या बरोबरीने स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला पाहीजे ही भुमिका घेतली व स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांना सहभागी करून घेतले.

स्वातंत्र्योत्तर आधुनिक काळ म्हणजेच २१ व्या शतकात स्त्रिया शिक्षण घेऊण पुरूषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात कार्य करू लागल्या तरीही समाजात स्त्रियांना दुय्यम कनिष्ठ दर्जा दिला जात आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, क्षेत्रात आजही स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन प्रतिणामी स्वरूपाचाच दिसतो. आज महीला सक्षमीकरणासाठी अनेक कायदे आस्तित्वात आहेत त्यामध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१, हींदु विवाह कायदा १९९५ हिंदू उत्तराधिकारी कायदा १९५६, मातृत्व लाभासंबंधीचा कायदा १९६१ वैदयकीय गर्भपात कायदा १९७१, अश्लील प्रदर्शन बंदी कायदा, १९८६, गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा १९९४, कौटुंबिक हींसाचार प्रतिबंधक कायदा २००५ इ. कायदयामुळे स्त्री जीवनात बदल झाला आहे.

आज स्त्रिया शिक्षण, पोलिस, न्याय, आरोग्य विमान सेवा अशा सर्वच क्षेत्रात नोकरी करताना दिसतात. स्त्रियांनी सर्व क्षेत्रात उत्तुंग अशी भरारी घेतली असली तरीही तिच्या बाबतीत कुटूंबाच्या आणि समाजाच्या अपेक्षा प्रतिगामी पध्दतीच्याच वाटतात. विवाहबंधन चूल मूल अशा कौटुबिंक जबाबदाऱ्यातच ती गुंतून पडलेली आहे. आजही स्त्री विषयक अनेक कायदे व योजना असतानाही स्त्रीयावंर होणारे अन्याय, अत्याचार आपण ऐकुन वाचून आहोत म्हणजे कायदे व योजना असतानाही त्यावर लाभ ठेवणारा व कायद्याची अमलबजावणी करण्याची आवश्यकता होती. व ती पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय महीला आयोगाची स्थापना करण्यात आली.

राष्ट्रीय महीला आयोग :-

राष्ट्रीय महीला आयोग ही भारताच्या संविधानातील तरतुदी नुसार भारत सरकारने १९९२ मध्ये स्थापन केलेली वैधानिक संस्था आहे. सामाजिक आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील महीलांची प्रगती ही पुरूषापेक्षा फारच कमी आहे. देशाचा विकास करायचा असेल तर स्त्रियांचा विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महीला वर्षानिमित्त शासनाला प्राप्त झालेल्या अहवालानुसार महीलांच्या विकासाचे पर्व सुरू झाले. समाजातील सर्व क्षेत्रातील स्त्रियांचे संरक्षण व विकास करण्यासाठी शासनाने उचलेले महत्त्वाचे पाऊल आहे. महीलांना दिला जाणारा असामान्य दर्जा आणि अन्यायाची वागणुक याला प्रतिबंध करणे, कायद्यांच्या आढावा घेऊन आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यासाठी राष्ट्रीय महीला आयोगाची स्थापना करण्यात आली. त्या काळातील जनता सरकारने ३० ऑगस्ट १९९० रोजी राष्ट्रीय महीला आयोग अधिनियम पारित केला. त्याला दोन वर्षाने राष्ट्रपतींची मान्यता मिळाली व ३१ जानेवारी १९९२ मध्ये राष्ट्रीय महीला आयोगाची स्थापना करण्यात आली.

राष्ट्रीय महीला आयोगाची रचना :-

भारतात १९७४ मध्ये महीलांच्या संबलीकरणासाठी एक समिती नेमली गेली त्या समितीने भारतामध्ये केंद्रीय पातळीवर एक महीला आयोग्य स्थापना करण्याची शिफारस केली व ३१ जानेवारी १९९२ साली राष्ट्रीय महीला आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगात १ अध्यक्ष व ५ सदस्य असतात. ते सदस्य पुढील पाच श्रेणीतून नियुक्त केले जातात. समाजशास्त्रीय समुह, कायदे पंडीत गट, श्रमिक संघ गट, औद्योगिक व्यवस्थापन प्रशासन गट, सामाजीक व आर्थिक विकास गट इ पाच क्षेत्रातील सदस्य आयोगावर नियुक्त केले जातात. या आयोगाचा कालावधी ३ वर्षे आहे

राष्ट्रीय महीला आयोगाची कार्ये :-

१) महीलांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय विकाससाठी नियोजन प्रक्रीयेत सहभाग वाढविणे व झालेल्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. २) महीलांचा सर्वांगीण विकास, उन्नती होण्यासाठी शैक्षणिक संशोधन कार्य करणे. ३) महीलांना प्रवृत्त करणाऱ्या सर्व धोरणात्मक बाबीवर सरकारला सल्ला देणे. ४) केंद्र आणि राज्यातील महीलांच्या विकासाच्या प्रगतीचे मुल्यमापण करणे. ५) महीला संरक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या कायद्याचे परिक्षण करणे व त्यात त्रुटी असल्यास सरकारला त्या संशोधन करण्यासाठी मदत करणे. ६) महीलांच्या विकाससंबंधी दरवर्षीचा अहवाल शासनाकडे पाठविणे. ७) स्त्रिविषयक करण्यात आलेल्या घटनात्मक संविधानातील तरतुदींचा अभ्यास करणे.

अशी स्त्री जीवनाशी संबंधीत कार्ये राष्ट्रीय महीला आयोगामार्फत पार पाडली जातात. यामुळे महीला सबलीकरणाला वेग मिळत आहे व हा आयोग सातत्याने कार्ये करीत आहे. महीलांच्या सबलीकरणासाठी या आयोगामार्फत चर्चासत्र, परीषद कार्यशाळा घेतल्या जातात. विविध विषयावर व्याख्याने आयोजित केली जातात.

<u>संशोधन अभ्यासाचे महत्व :-</u>

भारतात पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे पूर्वीपासुन स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले आहे स्त्रियांना पूर्वीपासुन पुरूषापेक्षा कमी लेखले जात होते पण जर खरंच देशाचा विकास करायचा असेल तर स्त्रियांना सक्षम बनवणे आवश्यक आहे. व स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने वागवले पाहीजे हा विचार पुढे आला व ते साध्ये या प्रकरण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा प्रयत्न केले जात आहेत या प्रयत्नात भारत देशाचाही समावेश आहे यामध्ये योजना, कायदे व राष्ट्रीय व राज्य महीला आयोगाचे मोलाचे योगदान आहे. या विविध कायदे व योजनांमुळे स्त्रीजीवनात सकारात्कक बद्दल दिसुन आले. म्हणूनच २००१ हे वर्ष महीला वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. स्त्रियांना या आयोगामुळे संरक्षण प्राप्त झाले आहे. या आयोगाच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहेत. यामुळे महीला सक्षमीकरणात महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय महीला आयोगाचे योगदान या विषयाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

<u>संशोधन समस्या :-</u>

१) महीलामधील अज्ञान व अशिक्षितपणा.

२) महीलावर झालेल्या रूढी परंपराचा परीणाम.

३) भारतीय पुरूषप्रधान संस्कृती व महीला.

४) मानवी व हक्क व स्त्रिया.

५) महीला आरक्षण व प्रत्यक्ष अंमलबजावणी.

६) महीलांवरील कौटुंबिक हींसाचार व महीला आयोग.

<u>संशोधनाचे उद्देश :-</u>

१) महाराष्ट्र राज्यात महीला सबलीकरणासाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमाचा अभ्यास करणे.

२) महीला सबलीकरणावर राष्ट्रीय महीला आयोगाचा परिणामाचा अभ्यास करणे.

३) महीला सक्षमीकरणासाठी करण्यात आलेल्या कायद्याचा अभ्यास करणे.

४) महाराष्ट्र राज्यातील विविध योजनाचे मूल्यमापन करणे.

५) राष्ट्रीय महीला आयोगामुळे महाराष्ट्र राज्यातील महीलामंध्ये झालेल्या सकारात्मक बदल अभ्यासणे.

६) महीला सबलीकरणातील समस्याच्या शोध घेऊन उपाय सुचवणे.

संशोधनाचे गृहीतके :-

१) महीला सबलीकरणाला राष्ट्रीय महीला आयोगाच्या स्थापनेनंतर वेग आला.

२) महीलांना सक्षम बनवण्यात विविध योजना व कायदे यांच्या महत्त्वपुर्ण वाटा आहे.

३) महीलांच्या विकासासाठी शासनाकडुन विविध योजना राबवल्यामुळे महीलांच्या दर्जात बदल झाला आहे.

४) राष्ट्रीय महीला आयोगाच्या स्थापनेमुळे योजना व कायद्याची अंमलबजावणी झाली आहे.

५) राष्ट्रीय महीला आयोगाच्या निर्मीतीमुळे महीलांना सामाजिक-सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात समानतेच्या संधी निर्माण झाल्या.

६) राष्ट्रीय महीला आयोगाच्या सुचनामुळे महीला विषयक अनेक कायद्यात सुधारणा झाली आहे.

७) राष्ट्रीय महीला आयोगाच्या स्थापनेमुळे स्त्रियांना न्याय मिळू लागला आहे.

संशोधन पध्दती :-

सदरील संशोधनात प्राथमिक सामग्री व दुय्यम सामग्री या दोन्हींचा अवलंब करण्यात आलेला आहे.

अ) प्राथमिक साधने :-

प्राथमिक साधनसामग्री मध्ये अवलोकन, सर्वेक्षण, मुलाखत इ. साधनांचा वापर करण्यात येईल.

ब) दुय्यम साधने :-

दुय्यम साधनामध्ये विशालेश्नात्मक संशोधन पध्दतीचा आधार घेऊन यादूछिक नमुना निवड पध्दतीतील नमुन्याची सोयीस्कर रित्या निवड करून संशोधन करण्यात येईल. तसेच वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके, संदर्भ ग्रंथ, त्या संबंधी कागद पत्राचा वापर व ग्रंथालयीन अध्यायण करण्यात येईल.

संशोधनाच्या मर्यादा :-

महीला सबलीकरणामध्ये राष्ट्रीय महीला आयोगाचे योगदान : संदर्भ महाराष्ट्र राज्य हया विषयावर संशोधनासाठी काही मर्यादा येवु शकतात. महीला सबलीकरणात राष्ट्रीय महीला आयोगाचे योगदान हयात महाराष्ट्र राज्यातील महीला सबलीकरणावर अध्ययण करण्याचा प्रयत्न केला जाईल. तुलनात्मक अध्ययन प्रक्रीये संदर्भात इतर राज्यांचा महीला सबलीकरणाचा अध्ययन विषयात समावेश असेल.

प्रकरणाची रूपरेषा :-

प्रकरण १ ले :- महाराष्ट्रात महीला सबलीकरणाची उगम व विकास.

प्रकरण २ रे :- महाराष्ट्रात महीलांसाठी केलेले कायदे व योजना.

प्रकरण ३ रे :- महाराष्ट्रात महीला सबलीकरणात राष्ट्रीय महीला आयोगाची भुमिका व कार्य.

प्रकरण ४ थे :- महीला सबलीकरण आणि महाराष्ट्र.

प्रकरण ५ वे :- महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्था व महीलांचा सहभाग.

प्रकरण ६ वे :- महाराष्ट्रातील महीला व संस्कृती.

प्रकरण ७ वे :- निष्कर्ष व शिफारशी.

संदर्भ ग्रंथ सूची :-

१) डॉ. ए. एन. अग्निहोत्री - महीला सशक्तीकरण और कानून.

२) डॉ. स्वाती कर्वे - स्त्री विकासाची नवी क्षितिजे.

३) ॲड. रोहीणी कुंडले - महीलांसाठी उपयोगी कायदे.

४) अर्चना मेढेकर - महीलांचे कायदे.

५) रमा शर्मा - महीला विश्वकोश २००९

६) हरी नरके - महीलांचे मानवी अधिकार.

७) डॉ. कृष्णकुमार वर्मा - महीला कानून व मानवाधिकार.

८) मानचंद खंडेला - महीला सशक्तीकरण.

९) प्रकाश नारायण नटाणी - महीला संरक्षण व न्याय.

१०) google.mpscworld.com.

११) सिंह मिनाक्षी - महीला सशक्तीकरण का सच.

१२) डॉ. पाटील आनंद - महीला सबलीकरण स्पर्धा परीक्षा, फेब्रुवारी २०१३ पृष्ठ क्र. ५

१३) प्रा. एस. बी. गजभारे - राष्ट्रीय विकासासाठी स्त्री सबलीकरण योजना, मे २००७ पृ. क्र. २०७

१४) प्रा. डॉ. मुलानी एम. यू. - अल्पबचत नियोजन (बचतगट) डायमंड पब्लीकेशन, पुणे, २००८ पृ. क्र. १८९

संशोधक

शितल लहू बोडके

मार्गदर्शक

डॉ. नानासाहेब बालासाहेब पाटील
समाजशास्त्र विभागप्रमुख
माधवराव पाटील महाविद्यालय, पालम
ता. पालम जि. परभणी